रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ *तुफान और दिया, जलती निशानी, जिंदगी जिंदगी, इज्जत, पुकार, डॉक्टर, राहगीर, जादू* या चित्रपटाचे नायक-नायिका, संगीतकार व दिग्दर्शक कोण?

– *तुफान और दिया*मध्ये नायक-नायिका होते राजेंद्रकुमार-नंदा, संगीतकार वसंत देसाई, दिग्दर्शक प्रभातकुमार. *जलती निशानी* या नावाचा चित्रपट दोनदा आला. १९३२ला पहिला. १९५७ला दुसरा. १९३२चा *जलती निशानी* हिंदीबरोबर मराठीतदेखील आला होता. मराठीत या चित्रपटाचं नाव होतं *अग्निकंकण*. नायक-नायिका मा. विनायक-लीला. संगीतकार गोविंदराव टेंबे, दिग्दर्शक व्ही. शांताराम. १९५७च्या *जलती निशानी*चे नायक-नयिका कमल कपूर-गीताबाली, संगीतकार अनिल विश्वास, दिग्दर्शक हरीश. *जिंदगी जिंदगी*चे नायक-नायिका होते सुनील दत्त-वहिदा रहेमान, संगीतकार एस.डी. बर्मन, दिग्दर्शक नयन सिन्हा. *इज्जत* या नावाचा चित्रपट चार वेळा निघाला. १९३७ला पहिला. नायक-नायिका अशोककुमार-देविकाराणी, संगीतकार सरस्वतीदेवी, दिग्दर्शक फ्रेन्झ ओस्टेन, १९५२ला दुसरा. नायक-नायिका अमरनाथ-निरुपा रॉय, संगीतकार बुलोसी-रानी, दिग्दर्शक नमूर बेहरामशहा, १९६८ला तिसरा. धर्मेंद्रचा या चित्रपटात डबल रोल होता व तनुजा आणि जयललिता त्याच्या नायिका होत्या. संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल, दिग्दर्शक टी. प्रकाशराव. १९९१ला चौथा. नायक-नायिका जॅकी श्रॉफ-संगीता बिजलानी, संगीतकार अनु मलिक. *पुकार* तीनदा आला. १९३९ला पहिला. नायक-नायिका चंद्रमोहन-नस्सीम, संगीतकार मीरसाहेब, दिग्दर्शक सोहराब मोदी. १९८३ला दुसरा. नायक-नायिका अमिताभ बच्चन-झीनत अमान व रणधीर कपूर-टीना मुनीम, संगीतकार आर.डी. बर्मन, दिग्दर्शक रमेश बहल. त्यानंतर अलीकडेच राजकुमार संतोषींचा एक *पुकार* आला होता. नायक-नायिका अनिल कपूर-माधुरी दीक्षित, संगीतकार ए.आर. रहमान. *डॉक्टर* १९४१ला आला होता. नायक-नायिका पंकज मलिक-काननबाला, संगीतकार पंकज मलिक, दिग्दर्शक सुबोध मित्रा, *राहगीर* या नावाचा चित्रपट दोनदा आला. १९४३ला पहिला. नायक-नायिका त्रिलोक कपूर-शांतारित, संगीत खान मस्तान, दिग्दर्शक ए. रशिद १९६९ला दुसरा. नायक-नायिका विश्वजीत-संध्या रॉय, संगीतकार हेमंतकुमार दिग्दर्शक तरुण मजूमदार *जादू* दोनदा आला. १९५१ला पहिला. नायक-नायिका सुरेश-नलिनी जयवंत, संगीतकार नौशाद, दिग्दर्शक ए.आर. कारदार, १९६६ला दुसरा. नायक-नायिका रंजन-चित्रा, संगीतकार बुलोसी. रानी, दिग्दर्शक बी. गुप्ता.

□ आल्हाद कोणकोणत्या चित्रपटात बालकलाकार म्हणून चमकला?

– *चिमणी पाखरं, अबोली, ओवाळणी, धाकटी जाऊ, सांगत्ये ऐका* या मराठी व *भाग्यवान* या हिंदी चित्रपटात.

पी.एस. म्हापसेकर, म्हापसा गोवा.

□ शशी कपूर व नंदा ही जोडी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र चमकली?



जब जब फूल खिलेमध्ये शशी कपूर - नंदा

– *चार दीवारी, मेहंदी लगी मेरे हाथ, जब जब फूल खिले, मोहब्बत इसको कहते है, नींद हमारी ख्वाब तुम्हारे, जुआरी, राजा साहब.*

□ कालचा बालनट एन.कबीर कधी नायक बनला होता काय?

– १९४६चा *बच्चों का खेल* मीनाकुमारीने नायिकेची भूमिका केलेला पहिला चित्रपट. एन.कबीर या एकाच चित्रपटात नायकाच्या भूमिकेत चमकला. पण मीनाकुमारीचा नायक म्हणून नव्हे. हास्य अभिनेता आगा या चित्रपटात मीनाकुमारीचा नायक होता. आणि एन.कबीर या चित्रपटात त्याच्या काळातील एक बालतारका बेबी शकुंतला हिच्याबरोबर नायकाच्या भूमिकेत चमकला होता. त्याने उंचीत मार खाल्ला. यामुळे नंतर तो नायक बनू शकला नाही. राजेश खन्ना व शर्मिला टागोर यांचा सेक्रेटरी बनला.

□ 'तेरी गठरी मे लागा चोर...', 'जिंदगी का साज भी क्या साज है...', 'वो हमसे चूप है हम उनसे चूप है...', 'जब तुम भी चले परदेस लगाकर ठेस...', 'ऐ चोर छूपना जाना...', 'अखिया मिला के जिया भरमा के...' या गाण्यांचे गायक-गायिका कोण? चित्रपट कोणते? नायक-नायिका कोण?

– 'तेरी गठरी में लगा चोर...' हे गाणं *धूपछाँव* या चित्रपटातले के.सी.डेनी गायलं होतं. पहाडी संन्याल व उमादेवी या चित्रपटात नायक-नायिका होते. 'जिंदगी क्या साज है...' हे गाणे सोहराब मोदींच्या *पुकार* या चित्रपटात अभिनेत्री सायरा बानूची आई नसीम बानू हिने गायलं होतं. ती या चित्रपटाची नायिका होती. नायक चंद्रमोहन. 'हम उनसे चूप है...' हे गाणं *सरगम* या चित्रपटात सी. रामचंद्र तथा चितळकर व लता यांनी गायलं होतं. राज कपूर-रेहाना या चित्रपटाचे नायक-नायिका होते. 'जब तुम भी चले परदेस...' हे गाणं *रतन* या चित्रपटात करण दिवाणने गायले होते. तो या चित्रपटाचा नायक होता. नायिका स्वर्णलता 'ऐ चांद छूप न जाना...' हे गाणं *जवाब* या चित्रपटात काननदेवीने गायले होते. तीच या चित्रपटाची नायिका होती. नायक बरुआ 'अखिया मिला के...' हे गाणं *रतन*मध्ये जोहराबाईने गायलं होतं. नायक-नायिका करण दिवाण-स्वर्णलता.

रामकृष्ण पाटोळे, अ. नगर.

□ दिलीपकुमार व राज कपूर यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केलीय?

– १९४९च्या *अंदाज* या एकाच चित्रपटात.

अतुल वारे, करमाळा.

□ अरुण सरनाईकचे गाजलेले चित्रपट कोणते? नायिका कोण?

– *रंगल्या रात्री अशा* (सीमा), *सवाल माझा ऐका* (जयश्री गडकर), *केला इशारा जाता जाता* (लीला गांधी, उषा चव्हाण), *संथ वाहते कृष्णामाई* (कामिनी कदम), *थांब लक्ष्मी कुंकू लावते, एक गाव बारा भानगडी, गण गौळण* (जयश्री गडकर), *धाकटी बहीण* (सुरेखा), *मुंबईचा जावई* (सुरेखा), *कुंकवाचा करंडा* (आशा काळे), *कसं काय पाटील बरं हाय का* (जयश्री गडकर), *पाच नाजूक बोटे* (आसावरी), *भोळी भाबडी* (सुरेखा), *फरारी* (जयश्री टी.), *पाहुणी* (कानन कौशल), *नाव मोठं लक्षण खोटं* (उषा चव्हाण), *सिंहासन* ●